CNR-MHNJ100009942014

नियमित दरखास्त क्र. ३०/२०१४
चंदुलाल– विरुध्द – गंगाराम

## <u>निशाणी क्र. ६५ वर आदेश</u>

अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

**<u>अर्ज</u> :**

२. प्रस्तुतचा अर्ज सुनील फटींग यांनी तहकुबीसाठी दाखल केला आहे. त्यांचे विधीज्ञ हे भारताबाहेर परिषद साठी गेले आहे. त्यामुळे ते न्यायालयात हजर नाही. सबब, दि. ३०.०३.२०२६ रोजी प्रकरण ठेवण्यात यावे, अशी त्यांनी विंनती केली.

**<u>खुलासा</u> :**

३. प्रस्तुतच्या अर्जावर धनको यांनी खुलासा दाखल केला नाही.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दरखास्त ही हुकुमनाम्याच्या समाधानासाठी दाखल करण्यात आली आहे. मा. जिल्हा न्यायालयात अपील दाखल केली आहे. ते अपील मा. जिल्हा न्यायालयाने फेटाळले, असे दिसून येते. मा. उच्च न्यायालयात देखील अपील दाखल करण्यात आले होते. मा. उच्च न्यायालयाने देखील ते फेटाळल्याचे दिसून येते.

५. मार्च,२०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

६.     न्यायालयाने धनको यांच्या अर्जामुळे ताबा अधिपत्रक निर्गमीत केले, असे दिसून येते. त्याबाबतचा आदेश दि. २९.०३.२०२५ रोजी पारीत केल्याचे दिसून येते. त्यानंतर नि.क्र. ५२ व ५३ अन्वये ऋणको यांनी अर्ज दाखल केला. त्यावर नि.क्र. ६० अन्वये धनको यांचा खुलासा दाखल आहे. अभिलेखावर अहवाल हा दाखल आहे. धनको यांना ताबा मिळाला, असे अहवालावरुन दिसून येते. ऋणको यांना प्रकरणाची माहिती आहे. माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी **यशपाल जैन–वि–सुशिलादेवी, सिव्हील अपील नं. ४२९६/२०२३** यामध्ये काही निर्देश दिले आहेत. दरखास्त ही सन २०१४ ची आहे. अभिलेखावर अर्जातील जे कथन आहे. ते योग्य व कायदेशीर नाही. अर्ज हा दि. २५.०३.२०२३ रोजी दाखल करण्यात आला. त्यानंतर आज पावेतो प्रकरण तहकुब करण्यात आले. त्यामुळे अर्ज निरर्थक झालेला आहे. सबब, एकंदरीत परिस्थीतीवरुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश :**

| | |
|---|---|
| १. | नि.क्र. ६५ चा अर्ज हा निरर्थक झाल्याने निकाली काढण्यात येतो. |

Sd/-

उमरेड

दिनांक : ०८.०४.२०२६.

(रा.भा. डोळे)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

उमरेड